
ePaper

**चांद्रयान 3 मोहिमेत टाटा अन् गोदरेजच्या कंपन्यांनी निभावली महत्त्वाची भूमिका**




| वर्ष - 7 | अंक - 112 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 24 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- पुजाराचं क्रिकेट करिअर संपलं?
- आमिषाचा खुलासा
- चंद्रावर फडकला तिरंगा!
- त्यांची मस्ती उतरवायची आहे!

# पुणे-नाशिक रेल्वे मार्गाला ‘गती’!

## » उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश : मंत्रीमंडळासमोर प्रस्ताव आणण्याची सूचना

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यांच्या विकासासाठी महत्त्वाचा असणारा पुणे-नाशिक रेल्वेमार्ग पूर्ण करण्याची अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. हा प्रकल्प प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी त्यातील अडचणी दूर कराव्यात. या अनुषंगाने पुणे-नाशिक रेल्वेमार्ग हा मेट्रो कायद्यानुसार पूर्ण करण्याबाबतचा प्रस्ताव परिवहन विभागाने मंत्रिमंडळासमोर आणावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यासंदर्भातील बैठकीत दिले.**








उपमुख्यमंत्री पवार यांनी पुणे-नाशिक ग्रीनफिल्ड ब्रॉडगेज हायस्पीड रेल्वेमार्गासंदर्भात आज मंत्रालयात बैठक घेतली. या बैठकीस आमदार अतुल बेनके, मुख्य सचिव मनोज सौनिक, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, परिवहन विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, व्यवस्थापकीय संचालक (महारेल) राजेशकुमार जैसवाल तसेच इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, पुणे-नाशिक रेल्वेमार्ग करण्याबाबत गेल्या २५ वर्षांपासूनची मागणी आहे. मात्र, विविध कारणांमुळे हा मार्ग तयार करण्याचे काम रेल्वेला शक्य झाले नाही. त्यामुळे हा मार्ग मेट्रो कायद्यानुसार ‘महारेल’च्या माध्यमातून पूर्ण करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवण्याचे त्यांनी निर्देश दिले. संपूर्ण प्रकल्पात रेल्वे आणि राज्य सरकारचा प्रत्येकी २० टक्के हिस्सा असेल, तर ६० टक्के निधी कर्ज स्वरूपात उभारण्यात येणार आहे. रेल्वे प्रशासनाकडून या प्रकल्पासाठी निधी मिळविण्यासाठी बँकांकडून चाचपणी करण्यात येत आहे.

### रेल्वेमार्ग अंतिम मंजुरीच्या प्रतिक्षेत...

» गेल्या फेब्रुवारीमध्ये पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेला तत्वत: मान्यता दिल्याचे जाहीर केल्यानंतर अडीच महिने उलटले, तरीही अद्याप हा रेल्वेमार्ग अंतिम मंजुरीच्या प्रतीक्षेतच आहे. या प्रकल्पात पुन्हा काही तांत्रिक त्रुटी काढण्यात आल्या असून, पुण्याची मेट्रो आणि रिंग रोडनंतर हा प्रकल्प वर्षोनुवर्षे फक्त चर्चेच्या ट्रॅकवरच फिरत राहणार का? अशी भीती पुणेकरांना वाटत आहे. पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्प पुणे जिल्ह्यातील हवेली, खेड, आंबेगाव, जुन्नर या तालुक्यांतील ५४ गावांतून जाणार आहे. त्यासाठी ४७८ हेक्टर जमीन संपादित करावी लागणार आहे. या जमिनीच्या भूसंपादनासाठी साडेतीन हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे.

# “चांद्रयान- ३”च्या यशामुळे भारत अंतराळ संशोधनात बलशाली!

## » भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या भावना

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**संपूर्ण जगाचे लक्ष या चांद्रयान-३ मोहिमेकडे लागले होते. भारतातील नागरिक या ऐतिहासिक क्षणाची आतुरतेने वाट पाहत होते. हे अभियान यशस्वी करणाऱ्या सर्व शास्त्रज्ञांचे, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आणि केंद्र सरकारचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. या यशस्वी मोहिमेमुळे भारत विज्ञानात जगात बलाढ्य आहे, यावर आणखी एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. हा क्षण विद्यार्थ्यांसोबत अनुभवता आले याचे समाधान वाटते, अशा भावना भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केल्या...**



भारतीय अंतराळ संस्था (इस्त्रो)चे 'चांद्रयान-3' चंद्राच्या पृष्ठभागावर यशस्वीपणे उतरले. हा ऐतिहासिक क्षण भारतीय जनता पार्टीतर्फे नवी सांगवी येथील न्यू मिलेनियम इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांसोबत आनंदात आणि उत्साहात साजरा केला. यावेळी शहराध्यक्ष शंकर जगताप आणि पदाधिकारी उपस्थित होते. देशाचा तिरंगा ध्वज हातात घेऊन विद्यार्थ्यांनी "भारत माता की जय" च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला. तसेच, कृष्णा चौक येथील जनसंपर्क कार्यालयासमोर ढोल-ताशांच्या गजरात भंडारा उधळत पेढे वाटून हा आनंद द्विगुणित करण्यात आला.

शंकर जगताप म्हणाले की, संपूर्ण देशात या मोहीमेनंतर दसरा, दिवाळीसारखे आनंदी वातावरण आहे. गेली सव्वा महिना देश ज्या ऐतिहासिक विजयी क्षणाची वाट पाहत होता तो क्षण केवळ देशानेच नाही तर संपूर्ण जगाने अनुभवला. या यशाने भारताचा जागतिक पातळीवरील दबदबा आणखी वाढला आहे. या मोहिमेतून जे यश मिळाले त्याचा फायदा संपूर्ण जगाला होणार आहे.

> “ देशाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रुपाने भक्कम नेतृत्व लाभल्याने भारत सर्वच क्षेत्रात दमदार प्रगती करत आहे. पंतप्रधानांनी या मोहिमेकरीता दिलेले प्रोत्साहन, दाखवलेला विश्वास देखील अत्यंत महत्वपूर्ण ठरला. तोच विश्वास इस्त्रोने सार्थ ठरवीत चंद्राला गवसणी घातली. या प्रेरणादायी यशाबद्दल इस्त्रोचे अध्यक्ष एस. सोमनाथ व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे अभिनंदन करतो.
>
> **- शंकर जगताप,** शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# उरुळी देवाची, फुरसुंगीत विकासकामे!

## » पुणे महापालिकेकडून एक कोटींच्या कामांना मंजुरी

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उरुळी देवाची आणि फुरसुंगी या गावांमध्ये पुन्हा विकासकामे सुरू करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. त्यानुसार या दोन्ही गावांमध्ये एक कोटीपर्यंतची विकासकामे करण्यात येणार आहेत. महापालिकेच्या वित्तीय समितीनेही या कामांना मान्यता दिल्याने येत्या काही दिवसांत निविदा प्रक्रिया राबविली जाणार आहे. त्यामुळे या दोन्ही गावांतील विकासकामांना गती मिळणार आहे.**



उरुळी देवाची आणि फुरसुंगी या गावांचा ऑक्टोबर २०१७ मध्ये महापालिका हद्दीत समावेश करण्यात आला होता. त्यानंतर महापालिका प्रशासनाकडून दोन्ही गावात विकासकामे सुरू करण्यात आली होती. गेल्या पाच वर्षांत सुमारे २५० कोटी रुपये या गावांमध्ये खर्च झाले आहेत. तसेच ३९२ कोटी रुपयांच्या मलःनिसारण प्रकल्पामध्ये या दोन्ही गावांमध्ये सुमारे ४२ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. या दोन्ही गावांत ३७१ हेक्टरची टीपी स्कीम शासनाने मंजूर केली आहे. महापालिका हद्दीतून उरुळी देवाची आणि फुरसुंगी गावे वगळण्यासंदर्भातील प्रारूप अधिसूचना राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने जानेवारी महिन्यात काढली होती. या दोन्ही गावांची मिळून नगरपरिषद करण्याचे प्रस्तावित होते.

त्यासंदर्भात राज्य शासनाकडून महापालिकेला अभिप्राय विचारण्यात आला होता. गावे वगळण्यास हरकत नसल्याचा अभिप्राय महापालिकेने दिल्यानंतर त्याबाबतच हरकती-सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्याचा अहवाल नगरविकास विभागाला पाठविण्यात आला आहे. गावे वगळण्याबाबतची अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर महापालिका प्रशासनाकडून या दोन्ही गावांतील विकासकामे थांबविण्यात आली होती. गावांचा विकास खुंटल्याची तक्रार सातत्याने होत असल्याने या गावांमध्ये विकासकामे करण्यासंदर्भातील चर्चा सुरू झाली होती. त्यातच महापालिका हद्दीत गावे वगळण्यात आलेली नाहीत आणि कायदेशीर बाबी तपासूनच गावे वगळण्यासंदर्भातील निर्णय घेतला जाईल, अशी हमी राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने दिल्याने विकासकामे करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

### प्रादेशिक विकास योजनेलाही गती

» फुरसुंगी आणि उरुळी देवाची या दोन गावांत मिळकतकर आकारणी चुकीच्या पद्धतीने झाली असल्याने लाखो रुपयांची थकबाकी निर्माण झाली आहे. त्या विरोधात नागरिकांनी तक्रारी केल्या. शिवसेना शिंदे गटाचे माजी आमदार विजय शिवतारे यांनी गावे वगळण्याबाबत आग्रही भूमिका घेतली होती. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गावे वगळण्याचा आणि या दोन्ही गावांची मिळून नगर परिषद करण्याचा निर्णय जाहीर केला होता. मात्र आता या गावांमध्ये रस्ते, सांडपाणी वाहिन्या तसेच अन्य पायाभूत सुविधांची कामे केली जाणार आहेत. रखडलेल्या प्रादेशिक विकास योजनेलाही गती मिळण्याची शक्यता आहे.

# आपचे पुण्यात भीक मांगो आंदोलन!

## » पावसाळी पाईपलाईन बाबत उपाययोजना करा

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आम आदमी पार्टीकडून बुधवारी "भीक मांगो" आंदोलन करण्यात आले. खराडी मधील 'आपले घर' परीसरात पावसाळी स्टॉर्म वॉटर पाईपलाईन नसल्याने परिसरातील नागरिकांच्या घरात दर वर्षी पाच फूट पाणी शिरते. त्यामुळे अनेक नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागतो. गेल्या 10 वर्षात क्षेत्रीय कार्यालयाशी अनेक वेळा नागरिकांनी पत्रव्यवहार करून देखील कोणतीच उपाययोजना करण्यात आली नाही. अनेक वेळा पाठपुरावा करून निधी उपलब्ध नाही, असे मोघम उत्तर येण्यात येत होते. याच्या विरोधात बुधवारी आम आदमी पार्टी कडून "भीक मांगो" आंदोलन करण्यात आले.**




### यांची होती उपस्थिती

» विजय कुंभार, तानाजी शेरखाने, सुनिता शेरखाने, संजय कोणे, अक्षय दावडीकर, शिवाजी डोलारे, डॉ. अभिजित मोरे, सुजित अग्रवाल, मुकुंद किर्दत, सीमा गुट्टे, अमित म्हस्के, धनंजय बेनकर, अनिल धुमाळ, गणेश ढमाले, मनोज फुलावरे, बाळासाहेब चोकर, मिताली वडवराव, प्रीती निकाळजे, मयूर कांबळे उपस्थित होते.

आम आदमी पार्टीचे राज्य उपाध्यक्ष विजय कुंभार यांनी आपले घर परिसरात अद्यापही पावसाळी पाईपलाईन न टाकल्याने संताप व्यक्त केला. नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर मिळकत कर वसूल करणाऱ्या महानगरपालिकेने वर्षानुवर्षे साधी पावसाळी स्टॉर्म वॉटर लाईन टाकू नये याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. गेली 10 वर्षे हा प्रश्न अधिकाऱ्यांनी तसाच खितपत ठेवला.

आता हा प्रश्न आम आदमी पार्टी उचलून धरेल असे मत व्यक्त केले. यावेळी आम आदमी पार्टीचे प्रभाग अध्यक्ष तानाजी शेरखाने, सुनीता शेरखाने, संजय कोणे यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा करून या विषयी प्रश्नाचे गांभीर्य समजावून सांगितले.


नगररोड क्षेत्रीय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त यांनी याबाबत तातडीने पावसाळी पाईपलाईन बाबत तातडीने प्रस्ताव बनवून अतिरिक्त आयुक्त व प्रकल्प अधिकाऱ्यांकडे पाठविण्याचे आश्वासन दिले. तसेच या पावसाळ्यात नागरिकांच्या घरामध्ये पाणी जाऊ नये यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे क्षेत्रीय अभियंता यांना आदेश दिले.

# गुंठेवारीतील बांधकामे नियमितसाठी मुदतवाढ

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

गुंठेवारीतील बांधकामे नियमित करण्यासाठी प्रतिसाद मिळत नसल्याने पुन्हा मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव बांधकाम विभागाने महापालिका आयुक्त कार्यालयाला दिला आहे. आयुक्तांच्या मंजुरीनंतर या मुदतवाढीचा निर्णय होणार आहे. शहरामध्ये अर्धा गुंठा, एक गुंठा आणि दोन गुंठे अशा जागांवर छोटी-छोटी बांधकामे करण्यात आली आहेत. ही संख्या जवळपास ७० हजारांच्या आसपास असल्याची नोंद महापालिकेच्या बांधकाम विभागाकडे आहे.

राज्य शासनाने गुंठेवातीतील बांधकामे नियमित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार २०२१ पासून ही प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मात्र कागदपत्रांची पूर्तता, आकारले जाणारे शुल्क तसेच किचकट नियमांमुळे बांधकामे नियमित करण्यास अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही. महापालिकेकडे



गुंठेवारीसाठी ८५६ अर्ज दाखल झाले होते. त्यातील केवळ २१ प्रकरणे मंजूर झाली असून, ५४७ प्रकरणे फेटाळण्यात आली आहेत. तर २८९ प्रकरणे मान्यतेच्या प्रक्रियेत आहेत.

दरम्यान, महापालिका प्रशासनाकडून या योजनेसाठी ३१ जुलै २०२३ पर्यंतची मुदतवाढ देण्यात आली होती. ती संपल्यामुळे गुंठेवारीतील बांधकामे नियमित करण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी राजकीय पक्षांकडून करण्यात आली होती. त्यानुसार अर्ज करण्यासाठीची मुदत चार महिन्यांनी वाढविली असून, येत्या ३१ डिसेंबरपर्यंत नागरिकांना अर्ज करता येणार आहेत. तसा प्रस्ताव आयुक्त कार्यालयाला देण्यात आला आहे.

# कचरा संकलन केंद्राचे काम थांबवले!

## सोसायटी फेडरेशनच्या तगाद्याला मिळाले यश

### पालिका प्रशासनाचे आमदार लांडगेंना पत्र

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाचा मोशी येथील सिल्वर-9 सोसायटीजवळ कचरा संकलन केंद्र उभारण्याचा प्रकल्प बांधणीचे काम अखेर महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी थांबवण्याचा निर्णय घेतला आहे.**





चिखली-मोशी-चऱ्होली पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेनच्या तगद्यासमोर प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्यामुळे सोसायटीधारकांना दिलासा मिळाला आहे. प्रस्तावित कचरा संकलन केंद्राला स्थानिक नागरिकांनी विरोध केला होता. सुमारे ५ हजार लोकवस्ती असलेल्या परिसरात कचरा संकलन केंद्र करुन नागरी आरोग्याचा प्रश्न निर्माण करु नये, अशी मागणी चिखली-मोशी-चऱ्होली पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी केली होती. तसेच, या केंद्राबाबत प्रशासनाविरोधात आंदोलनाचाही इशारा दिला होता.

दरम्यान, सोसायटी फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांनी भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांची भेट घेतली होती. यावर आमदार लांडगे यांनी "लोकवस्तीच्या ठिकाणी कचरा संकलन केंद्र नकोच.." अशी सूचना महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना केली होती. यावर प्रशासनाने दोन दिवसांपूर्वी याच परिसरातील तीन पर्यायी जागांचा शोध घेतला. त्यावर कार्यवाही सुरू आहे. त्यामुळे प्रशासनाने सिल्वर-9 सोसायटीजवळील प्रस्तावित कचरा संकलन केंद्राचे काम सद्यस्थितीत थांबविण्याचा निर्णय घेतला आहे.



"शहरात ठिकठिकाणी कचरा संकलन केंद्र उभारण्याबाबत प्रशासनाने पुढाकार घेतला होता. मात्र, लोकवस्तीमध्ये किंवा नागरी आरोग्याच्या तक्रारी येतील, अशा ठिकाणी कचरा संकलन केंद्र उभारू नये, अशी आमची मागणी होती. याबाबत आमदार महेश लांडगे यांनाही आम्ही सांकडे घातले. त्यांनी आमच्या मागणीला पाठिंबा दिला. प्रशासनाने सदर कचरा संकलन केंद्र बांधणीचे काम थांबवण्याचा निर्णय घेतला याबद्दल आयुक्त शेखर सिंहसाहेब आणि आमदार महेश लांडगे यांचे आभार व्यक्त करतो. सध्या सदर काम पूर्णपणे थांबवले असून, जागा बदलण्यात येणार आहे.

**-संजीवन सांगळे,** अध्यक्ष, चिखली-मोशी-चऱ्होली पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशन.



"मोशी आणि परिसरातील लोकवस्ती वाढली असून, कचरा संकलन केंद्रातून निर्माण होणाऱ्या दुर्गंधीचा त्रास नागरिकांना सहन करावा लागला असता. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने कासारवाडी आणि गवळीमाथा येथे अशाप्रकारचे कचरा संकलन केंद्र प्रायोगिक तत्त्वावर उभारले आहे. त्या ठिकाणी लोकवस्ती नाही. त्यामुळे सिल्व्हर-९ सोसायटीलगतचे प्रस्तावित केंद्र रद्द करण्याची सूचना प्रशासनाला केली होती. त्याला आयुक्त शेखर सिंह यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. लोकआग्रहास्तव घेतलेल्या निर्णयाबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

**- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा..

---

# शहरात लम्पीमुळे तीन जनावरांचा मृत्यू

## आणखी 30 जनावरे बाधित : महापालिका प्रशासनाकडून सतर्कता

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरात लम्पीचा प्रादुर्भाव वाढत आहे. शहरात 30 जनावरे लम्पीने बाधित आहेत. गेल्या 10 दिवसात 3 जनावरांचा लम्पीने मृत्यू झाला आहे. पशुवैद्यकीय विभागाकडून बाधित जनावरांवार उपचार सुरु आहे. निरोगी जनावरांचे लसीकरण करण्यात येत असल्याचे उपायुक्त संदीप खोत यांनी सांगितले...**



जनावरांना होणारा लम्पी हा आजार पुन्हा विषाणूजन्य चर्म रोगाचा प्रादुर्भाव होत असून तो रोखण्याचे आव्हान पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पशूवैद्यकीय विभागापुढे निर्माण झाले आहे. शहरात मोकाट फिरणारी व पाळीव जनावरांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. लम्पीची साथ नियंत्रणात असली. तरी, मागील 10 दिवसांमध्ये जनावरांना लम्पी रोगाची लागण होत असल्याचे आढळून आले आहे. 10 दिवसात 15 ते 20 जनावरांना लागण झाली आहे.

पशुवैद्यकीय विभागाकडून उपचारासाठी एक आणि लसीकरणासाठी एक अशी दोन पथके नियुक्त केली आहेत. त्यांच्यामार्फत जनावरांवर लसीकरण, उपचार सुरु आहे. बाधित जनावरांच्या गोठ्यात जावून उपचार केले जात आहेत. च-होली, चिखली, मोशी, निगडी या भागात बाधित जनावरे आढळत आहेत. आजपर्यंत बाधित 250 जनावरांचे लसीकरण पूर्ण झाले. 3 हजार जनावरांचे लसीकरण पूर्ण करण्याचे उदिष्ट आहे.

### कशामुळे होतो लम्पी आजार?

- लम्पी आजार हा कॅप्रीपॉक्स विषाणूमुळे होतो. त्यामुळे जनावरांच्या अंगावर 10 ते 20 मि.मी. व्यासाच्या गाठी येतात. सुरुवातीस भरपूर ताप येतो. डोळ्यातून नाकातून चिकट स्त्राव सुरु होतो. चारा पाणी खाणे कमी अथवा बंद होते. दूध उत्पादन कमी होते. काही जनावरात पायावर सूज येणे व लंगडणे, असे प्रकार घडतात.
- लम्पी आजार संक्रमण होणारा रोग आहे. डास, चावणाऱ्या माश्या, गोचिड, चिलटे, बाधित जनावरांचा स्पर्श, दुषित चारा-पाणी यामुळे हा आजार जोरात फैलावतो. त्यामुळे पशुपालकांनी चारा कमी खाणाऱ्या जनावरांचा तात्काळ ताप मोजावा व नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधून उपचार करुन घ्यावेत.




**चांद्रयान-३ मोहीमेनंतर आता इस्रो सूर्याचा अभ्यास करण्यासाठी मोहीम सुरू करणार आहे. आदित्य-एल१' हा उपग्रह पीएसएलव्ही अग्नीबाणावरून अवकाशात झेप घेईल. हा उपग्रह सूर्याच्या जवळ जाणार नाही, तर चार महिने प्रवास करून पृथ्वीपासून १५ लाख कि.मी. अंतरावरील 'एल१' या बिंदूपाशी जाईल. तो भारताची अवकाशातील प्रयोगशाळा असेल. तिच्या मदतीनं आपला सूर्याचा अभ्यास सुरु होईल.**

# चंद्रानंतर आता सूर्याचे वेध!



भारताचं चांद्रयान-३ चंद्राच्या भूमीवर उतरलं की लगेचच, म्हणजे ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात किंवा सप्टेंबरच्या सुरुवातीला इस्रो (भारतीय अवकाश संशोधन संस्था) सूर्याचा अभ्यास करण्यासाठी आपली मोहीम सुरू करणार आहे. त्यासाठी 'आदित्य-एल१' हा उपग्रह पीएसएलव्ही अग्नीबाणावरून अवकाशात झेप घेणार आहे.

अवकाशात गेल्यावर हा उपग्रह काही काळ पृथ्वीच्या भोवती फिरत राहून मोठ्या प्रवासासाठी आवश्यक ती गती मिळवेल आणि नंतर सूर्याच्या दिशेनं आपला प्रवास सुरू करेल. मात्र हा उपग्रह सूर्याच्या जवळ जाणार नाही, तर चार महिने प्रवास करून पृथ्वीपासून 15 लाख कि.मी. अंतरावरील 'एल1' या बिंदूपाशी जाईल. तिथं गेल्यानंतर हा उपग्रह आपलं काम करू लागेल. थोडक्यात, हा उपग्रह म्हणज भारताची अवकाशातील प्रयोगशाळाच असेल. तिच्या मदतीनंच आपला सूर्याचा अभ्यास करणं सुरू होईल. सूर्याच्या जवळ न जाता (सूर्य आपल्या पृथ्वीपासून सरासरी 14.96 कोटी कि.मी. अंतरावर आहे.) दूरवरून सूर्याचा अभ्यास करण्यासाठीच एल१ या बिंदूपाशी हा उपग्रह एका ठराविक भ्रमणकक्षेत फिरत राहून आपलं काम करणार आहे. हा एल१ बिंदू म्हणजे 'लॅग्रांज पॉईन्ट'. या बिंदूचा शोध जोसेफ लुईस लॅग्रांज या फ्रेंच शास्त्रज्ञानं १७७२ सालामध्ये लावला. त्याबाबत थोडक्यात असं सांगता येईल की मोठं वस्तुमान असणाऱ्या दोन गोष्टींमध्ये (इथं ग्रह किंवा तारा) एक लहान वस्तुमान असणारी वस्तू दोन मोठ्या वस्तुमान असणाऱ्या गोष्टींसह एकत्रितपणं, पण आपल्या ठिकाणीच राहून, प्रदक्षिणा घालू शकते, असं त्यानं सिद्ध करून दाखवलं. आपल्या सौरमालेमध्ये असे एकंदर पाच बिंदू आहेत. बिंदू आपल्याच सौरमालेत आहेत असं नाही, तर दोन मोठ्या वस्तुमान असणाऱ्या मालेमध्ये ते असतात. आदित्य-एल१ हा उपग्रह एल१ या बिंदूपाशी राहून आपलं काम करणार आहे. या बिंदूपाशी राहून काम करण्याचा सर्वांत मोठा फायदा म्हणजे आदित्य-एल१ या उपग्रहाला आपलं काम करताना कोणतेही अडथळे येणार नाहीत. पृथ्वीवर राहून सूर्याचा अभ्यास करताना ग्रहणाच्या वेळी किंवा पृथ्वीभोवतालच्या वातावरणामुळं किंवा अन्य कारणानं सूर्याचं सुस्पष्ट दर्शन होणं काहीवेळा अवघड होतं. सूर्याच्या अभ्यासामध्ये ती एक मोठीच अडचण असते. मात्र एल१ या बिंदूपाशी एका ठराविक भ्रमणकक्षेत फिरत राहून आपलं काम करताना आदित्य-१ एल या उपग्रहाला असे अडथळे येणार नाहीत. ठरल्याप्रमाणं हा उपग्रह सतत पाच वर्षे आपलं काम करत राहू शकेल. या लॅग्रांज बिंदूपाशी जाणाऱ्या अवकाशमोहिमा यापूर्वीसुद्धा यशस्वीपणं आखण्यात आल्या होत्या. लॅग्रांज बिंदू १ पाशी पहिली अवकाश मोहीम नासानंच १९७८ मध्ये आखली होती. ती यशस्वी झाल्यानं या बिंदूपाशी अवकाशयान पाठवणं शक्य आहे, हे स्पष्ट झालं. त्यानंतर युरोपीय स्पेस एजन्सीनं अशा अनेक मोहिमा आखल्या. आपला आदित्य-एल१ उपग्रहसुद्धा याच बिंदूपाशी राहून आपलं काम करणार आहे. ते करण्यासाठी या उपग्रहावर एकंदर सात उपकरणं आहेत. ती सर्वच्या सर्व भारतामधीलच विविध संस्थानी तयार केली आहेत. म्हणजेच ही मोहीम पूर्णपणं 'भारतीय' आहे. यातील चार उपकरणं ही दूरवरच्या अंतरावरून सूर्याचा वेध घेण्याचं काम करतील, तर तीन उपकरणं ही आपल्या अवतीभवतीच्या अवकाशाचं निरीक्षण करतील. सूर्याचा अभ्यास करणं महत्त्वाचं आहे, याचं कारण आपल्या विश्वात अनेक आकाशगंगा आहेत. आपला सूर्य ज्या आकाशगंगेत आहेत, तिच्यामध्ये जवळपास १०० अब्ज तारे आहेत. म्हणजेच आपल्या आकाशगंगेच्या तारकाविश्वातला आपला सूर्य हा एक तारा आहे. त्या ताऱ्याभोवती असणाऱ्या ग्रहमालेत आपला पृथ्वी नावाचा ग्रह आहे.

हे लक्षात आलं की एकंदर या विश्वाच्या अथांग आणि अफाट पसाऱ्यात आपलं स्थान काय आहे, असा विचार मनात येतो आणि तो आपल्याला अंतर्मुख करतो. तो विचार बाजूला ठेवला तरी अफाट पसरलेल्या या विश्वातल्या ताऱ्यांचं एकंदर स्वरूप काय आहे, ते आपल्याला या मोहिमेतून समजू शकणार आहे.

## संपादकीय »

### कर्जदारांना दिलासा

***कर्जदार व बँका किंवा बिगर बँकिंग आर्थिक संस्था यांच्यात दंडव्याज व दंडात्मक शुल्कामुळे विवाद निर्माण होऊन त्यातून गंभीर परिस्थिती निर्माण होते.***

याचे अलीकडील प्रसिद्ध दिग्दर्शक नितीन देसाई यांनी कर्जामुळे केलेली आत्महत्या व एका मोठ्या ज्वेलर्सवरील स्टेट बँकेकडून करण्यात आलेली कारवाई यांचा उल्लेख करावा लागेल. यासारखी अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे बँका आणि आर्थिक संस्था व कर्जदार यांच्यात वाद व तक्रारी निर्माण होऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई सुरू होते. याचा विचार करून रिझर्व्ह बँकेने दंडात्मक व्याजासंबंधी आणि शुल्कासंबंधी योग्य व पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शक तत्त्वे जारी केलेली आहेत. रिझर्व्ह बँकेच्या असे निदर्शनास आले आहे की, बँका आणि आर्थिक संस्था या कर्जदाराने कर्ज मंजुरीच्या अटी आणि शर्तींचे पालन केले नाही, तर करारात ठरलेल्या व्याजदरावर अतिरिक्त दंडात्मक व्याज लावतात. दंडात्मक व्याज आणि शुल्क आकारण्याचा मुख्य हेतू कर्जदाराला कर्जशिस्त पाळण्यासाठी जागृत करण्याचा आहे.

**युरोपियन आणि ऑस्ट्रेलियनसप्रमाणे भारतीय हॉकीने देखील आता 'फिटनेस मंत्रा'वर भर देण्यास सुरुवात केलीय. सर्व सामने केवळ फिटनेसवरच जिंकले जातात, असे अजिबात नाही. पण, फिटनेसची साथ असेल तर प्रतिस्पर्ध्यांना चारही सत्रात पुरते जेरीस आणून त्यांना चारीमुंड्या चीत करता येऊ शकते. भारतानं आशियाई चॅम्पियन्स हॉकीचे जेतेपद थाटात काबीज करताना नेमकी याचीच प्रचिती दिलीय.**

# आता मिशन पॅरिस ऑलिम्पिक!

सामना कोणताही असो, तो ज्याप्रमाणे एखाद्या मैदानात खेळला जातो, त्याचप्रमाणे 'माईंड गेम'मधूनही खेळला जातो. फरक इतकाच असतो की मैदानातला खेळ दिसतो आणि 'माईंड गेम' तसा थेट दिसत नाही. तो फक्त ज्या-त्या संघातील खेळाडूंच्या बॉडी लँग्वेजमधून झळकतो. अशा खेळाडूंना परिणामांची पर्वा असत नाही. कारण, ते एकाच ध्येयाने पछाडलेले असतात, संघाला कोणत्याही परिस्थितीत वर्चस्व प्रस्थापित करुन देणे! अलीकडेच संपन्न झालेल्या आशियाई चषक हॉकी स्पर्धेत भारतीय संघाने याचीच प्रचिती दिली. कर्णधार हरमनप्रीत असेल, गुर्जत सिंग असेल किंवा सुमीत! किती नावे सांगावीत? साम्य इतकेच यातील प्रत्येक जण संघाला कोणत्याही परिस्थितीत वर्चस्व प्रस्थापित करुन देण्याच्या एकमेव ध्येयाने पछाडलेला होता. जपानविरुद्ध उपांत्य सामन्यात सुमीतने केलेला धडाकेबाज गोल अवघ्या भारतीय



हॉकीला स्फूरण देणारा होता. सुमीत त्यावेळी राईट-आऊट पोझिशनवरुन इतक्या चपळाईने मनप्रीतचा पास घेऊन पुढे गेला की, प्रतिस्पर्धी जापनीज खेळाडूंना क्षणभर काय होते आहे, याचेही भान राहिले नाही. सुमीतने चेंडूचा ताबा घेत बेसलाईनवरुन मुसंडी मारत शेवटचा फटका इतक्या ताकदीने हाणला की, जपानच्या बचाव फळीसमोर त्यावेळी क्षणभर जागेवरच स्तब्ध उभे राहण्याशिवाय दुसरा काहीही पर्याय नव्हता. वास्तविक, जापनीज गोलरक्षक जवळपास पूर्ण गोलपोस्ट कव्हर केल्याप्रमाणे आ वासून उभा होता. पण, सुमीतचे बुलंद इरादे रोखण्याची त्या गोलरक्षकाकडेही ताकद नव्हती. सुमीतेने रिव्हर्स स्टीकने फ्लिक केलेला फटका गोलपोस्टमधे केव्हा विसावला, हे कोणालाच कळाले नाही. आता सुमीतने हा गोल करताना कोणतीही जादूची कांडी अजिबात फिरवली नव्हती. पण, मैदानात कोण कुठे तैनात आहे आणि यातून गोलपोस्टपर्यंत कशी मुसंडी मारायची, याचे गणित त्याच्या मनात जणू एखाद्या मायक्रो सेकंदात तयार झाले होते. सुमीतने गोलजाळ्याचा बेधडक पण अचूक वेध घेतला, त्यावेळी भारताने एव्हाना ३-० अशी एकतर्फी बाजी मारली होती. मलेशियाविरुद्ध फायनलमधे मात्र जणू आपले तोंडचे पाणी पळणं बाकी होते. पहिल्या ३० मिनिटांनंतर भारतीय संघ १-३ फरकाने पिछाडीवर होता. मलेशियाने यावेळी वेळकाढूपणाचा बचावात्मक पवित्रा स्वीकारला असता तरी ते त्यांच्यासाठी जेतेपदावर आपली मोहोर उमटवण्यासाठी पुरेसे ठरु शकले असते. तोवर, भारतीय खेळाडूंनी क्रेग फुल्टन यांचा 'डिफेंड टू प्ले' हा मंत्र अगदी उराशी बाळगला होता.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला 'महाईन्यूज'च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# 'चांद्रयान-3' चंद्रावर : राज्यात जल्लोष

## » भारतीयाला अभिमान वाटावा असा हा क्षण : मुख्यमंत्री

। वाळवा । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बुद्धिवंतांचा देश अशी ओळख असलेल्या आपल्या भारताने आज हे देदिप्यमान, ऐतिहासिक यश मिळवलं आहे. 'चांद्रयान ३' मोहिमेमधील विक्रम लॅन्डर चंद्रावर उतरले आणि या मोहिमेतील सर्वांत महत्त्वाचा टप्पा आज पार पडला. या यशाने सर्व भारतीयांचा ऊर अभिमानाने भरून आला आहे. देशातील सर्व शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, संशोधकांचं हे यश आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.**



त्यांनी वर्षा बंगल्यावर चांद्रयान-3 चा लँडिग सोहळा पाहिला. यावेळी राज्यातील मंत्री देखील उपस्थित होते. चांद्रयानचे यशस्वी लँडिंग होताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदें व सर्वांनी भारत मातेचा जयजयकार केला. यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांच्या दिशादर्शक नेतृत्वाचं आणि पाठिंब्याचं बळ शास्त्रज्ञांच्या पाठीशी आहे. श्रीहरीकोटा येथून 14 जुलैला 'चंद्रयान-3' हे चंद्राच्या दिशेने झेपावलं. अनेक अवघड टप्पे त्याने यशस्वीपणे पार केले. 'चांद्रयान 3' कडून वेळोवेळी पाठवण्यात आलेली छायाचित्रे आणि यानाची सकारात्मक प्रगती ही आजच्या या यशाची ग्वाही देत होते.

भारतीयांना असलेली यशाची खात्री आणि शास्त्रज्ञांचे कर्तृत्व आणि त्यांच्या बुद्धिमत्तेवरील अढळ विश्वास आज सार्थ ठरला आहे. या मोहिमेत इस्त्रोसोबतच देशातील काही खासगी कंपन्यांचा देखील सहभाग होता, ज्यांचा आम्ही नुकताच 'उद्योगरत्न' पुरस्काराने सन्मान् केला त्या रतन टाटाजी यांच्या टाटा स्टील कंपनीमध्ये बनविण्यात आलेल्या क्रेनचा वापर रॉकेट लॉन्चसाठी करण्यात आला, याचा मला अतिशय आनंद आहे. परवा रशियाचे 'लुना-२५' यान चंद्रावर उतरण्याआधीच कोसळले होते, त्या पार्श्वभूमीवर आज चंद्रयान ३ चे यश हे संपूर्ण जगात उजळून निघाले आहे. भारत आज महासत्तेकडे वाटचाल करीत आहे, त्यामुळे आजचे यश हे देशाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारा ठरले आहे, या मोहिमेमुळे भारताचे अवकाश संशोधनातील श्रेष्ठत्व पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. चंद्रयान ३ मोहीमेमधील विक्रम लॅन्डरच्या यशस्वी लँडिंगबद्दल समस्त भारतीयांचं आणि शास्त्रज्ञांचं पुन्हा एकदा अभिनंदन करतो, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. भारताच्या चांद्रयान-3 ने आज चंद्रावर यशस्वीरित्या सॉफ्ट लँडिंग केले.

### श्रेय लाटण्याचा प्रयत्न सुरू

» उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील चांद्रयान 3 ची लँडिंग लॅपटॉपवर पाहिले. त्यांनी देखील शास्त्रज्ञांचे अभिनंदन केले. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने आज आपली चांद्रयान -3 मोहीम फत्ते केली. त्यानंतर आता या मोहिमेवरून राजकीय श्रेय लाटण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी एका ट्विटद्वारे चांद्रयान -3 हा भारताचे प्रथम पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अभ्यासपूर्ण विचारांचा यशस्वी परिणाम असल्याचे म्हटले आहे.

# त्यांची मस्ती उतरवायची आहे!

## » ठाकरेंचा भाजपा-शिंदे गटावर हल्लाबोल

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिर्डीचे माजी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी आज (२३ ऑगस्ट) शिवसेनेच्या ठाकरे गटात जाहीर प्रवेश केला आहे. वाकचौरे यांच्यासह त्यांचे असंख्य कार्यकर्तेही ठाकरे गटात सामील झाले आहेत. भाऊसाहेब वाकचौरे यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत ठाकरे गटात म्हणजेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षात प्रवेश केला.**



या पक्षप्रवेशावेळी ठाकरे गटाचे खासदार विनायक राऊत आणि ठाकरे गटाचे नेते मिलिंद नार्वेकर उपस्थित होते. उद्धव ठाकरे यांच्या 'मतोश्री' या निवासस्थानी वाकचौरे यांनी हाती शिवबंधन बांधलं. शिवसेनेला जय महाराष्ट्र केल्यानंतर वाकचौरे हे काँग्रेस, भाजप असा प्रवास करून पुन्हा उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत परतले आहेत. माजी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या पक्षप्रवेशावेळी उद्धव ठाकरे यांनी एक छोटेखानी भाषण केलं. यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले, महाराष्ट्रात चमत्कार घडतोय. हाच चमत्कार आता देशात घडणार आहे. चार-पाच दिवसांपूर्वी भाऊसाहेब मला भेटले. त्यांनी मला सांगितलं की मी चूक केली, त्यामुळे मी तुमची आणि मातोश्रीची माफी मागतो. मी त्यांना म्हटलं, भाऊसाहेब, माझी माफी मागितली नाही तरी चालेल, परंतु, माझ्या शिवसैनिकांची माफी मागा. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले, केंद्रीय संस्थांचा गैरवापर करून माझ्या शिवसैनिकाला छळताय, त्याचा बदला माझा शिवसैनिक घेतल्याशिवाय राहणार नाही. भाऊसाहेब पक्ष सोडून गेले होते, त्यांना चूक समजली आहे. भाऊसाहेबांनी चूक केली होती.

### हिंमत असेल तर मैदानात या

» उद्धव ठाकरे म्हणाले, आजपर्यंत या पक्षातून त्या पक्षात, त्या पक्षातून या पक्षात, अशी पक्षांतरं खूप पाहिली आहेत. परंतु, पक्ष संपवण्याचं कटकारस्थान करणारे राजकारणी आणि पक्ष आपण पहिल्यांदाच पाहतोय. मी एकटाच, फक्त माझा पक्षच राहील, बाकीचे सगळे पक्ष मी संपवून टाकेन, ही त्यांची मस्ती आपल्याला उतरवायची आहे. मी लवकरच शिर्डीला येईन. तिथे भव्य सभा घेणार आहे. जे लोक शिवसेना संपवायला निघाले आहेत, त्यांना साईबाबांच्या साक्षीने आणि त्यांचा आशीर्वाद घेऊन मी आव्हान देतोय, हिंमत असेल तर मैदानात या, निवडणुकीला सामोरे जा.

# आता बोलायला नाक राहिलं नाही : बोंडे

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर ४० टक्के कर लावला आहे. या करवाढीनंतर महाराष्ट्रासह देशभरात शेतकरी आणि व्यापाऱ्यांकडून आंदोलनं केली जात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनीही सरकारच्या या निर्णयावरून टीका केली आहे. यावर भाजपा खासदार अनिल बोंडेनी यांनी प्रतिक्रिया दिली. शरद पवार यांनी कृषीमंत्री असताना कांदा निर्यातीवर बंदी आणली होती. आता विरोधकांना बोलायला नाक उरलं नाही, अशी शब्दांत बोंडे यांनी टीका केली आहे. यावेळी अनिल बोंडे म्हणाले की, केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर बंदी लादली नाही. त्यानी केवळ ४० टक्के कर लावला आहे. कराचा प्रश्न निर्माण झाल्यानंतर सरकारने लगेच नाफेडकडून दोन लाख टन कांदा शेतकऱ्यांकडून खरेदी करण्याचा संकल्प केला आहे. या कांद्याला २४१० रुपयांचा भाव जाहीर केला आहे. शेतकऱ्यांचं कोणतेही नुकसान होणार नाही, याची काळजी सरकारकडून घेतली जात आहे. शरद पवारांवर टीका करताना अनिल बोंडे पुढे म्हणाले, "खरं तर, विरोधकांना बोलण्यासाठी नाक राहील नाही. शरद पवार कृषीमंत्री असताना कांद्याची अशी परिस्थिती उद्भवली होती. तेव्हा त्यांनी अनियंत्रित काळासाठी निर्यात बंदी लागू केली होती. सरकारने आता निर्यात बंदी केलीच नाही, केवळ ४० टक्के कर लावला आहे. हा कर केवळ साठवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांवर अंकुश ठेवण्यासाठी लावला आहे. "शरद पवारांनी त्यांच्या काळात शेतकऱ्यांच्या भल्यासाठी कोणतंही काम केलं नाही, हे शरद पवार विसरून जातात. कापसाची निर्यातही शरद पवारांनी थांबवली होती. कांद्याची निर्यात बंदीही त्यांनी केली होती.

# चंद्रावर फडकला तिरंगा!

## ध्रुवावर स्वतःचा झेंडा फडकवणारा भारत पहिलाच देश

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चांद्रयान 3 ने बुधवारी संध्याकाळी 6:04 वाजता चंद्रावर यशस्वी लँडिंग केले. पंतप्रधान नरेंद्र मोदीदेखील जोहान्सबर्गमधून लाइव्ह स्ट्रिमिंगद्वारे कार्यक्रमात सहभागी झाले. तेथून त्यांनी देशाला संबोधित केले. पीएम मोदी म्हणाले-अशा ऐतिहासिक घटना देशाच्या जीवनाचे चैतन्य बनतात. हा क्षण अविस्मरणीय आहे. हा क्षण अभूतपूर्व आहे. विकसित भारताच्या शंखनादाचा हा क्षण आहे. नव्या भारताचा जयघोष करण्याचा हा क्षण आहे.**



पंतप्रधान म्हणाले की, प्रत्येक देशवासियांप्रमाणे माझेही लक्ष चांद्रयान महाअभियानावर आहे. मी माझ्या देशबांधवांशी आणि माझ्या कुटुंबियांशीही या उत्साह आणि आनंदात सहभागी आहे. भारत चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पोहोचला आहे, जिथे आजपर्यंत कोणताही देश पोहोचला नाही. आजपासून चंद्राशी संबंधित अनेक समज बदलतील. पंतप्रधान म्हणाले, 'माझ्या प्रिय कुटुंबीयांनो! असा इतिहास डोळ्यांसमोर घडताना पाहिल्यावर अभिमान वाटतो. अशा ऐतिहासिक घटना राष्ट्रजीवनाचे चैतन्य बनतात. हा क्षण अविस्मरणीय आहे. हा क्षण अभूतपूर्व आहे. विकसित भारताच्या शंखनादाचा हा क्षण आहे. नव्या भारताचा जयघोष करण्याचा हा क्षण आहे. अडचणींचा महासागर पार करण्याचा हा क्षण आहे. विजयाच्या चंद्रपथावर चालण्याचा हा क्षण आहे. हा क्षण 140 कोटी हृदयांच्या ठोक्यांच्या शक्तीचा क्षण आहे. हा भारताच्या नव्या ऊर्जेचा, नव्या चेतनेचा क्षण आहे. भारताच्या नव्या भाग्याचं आवाहन करण्याचा हा क्षण



आहे. अमरत्वाच्या पहिल्या प्रकाशात यशाचे अमृत बरसले. आपण पृथ्वीवर एक प्रतिज्ञा घेतली आणि ती चंद्रावर साकार केली. मोदी म्हणाले, आज आपण अवकाशात न्यू इंडियाच्या नव्या उड्डाणाचे साक्षीदार आहोत. प्रत्येक घरात उत्सव सुरू झाला आहे. माझ्या मनापासून, मी माझ्या देशवासीयांशी, माझ्या कुटुंबियांशी या उत्साहात आणि आनंदात सहभागी आहे. मी चांद्रयान टीम, इस्रो आणि देशातील सर्व शास्त्रज्ञांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. ज्याने या क्षणासाठी वर्षानुवर्षे खूप कष्ट केले. आपल्या शास्त्रज्ञांच्या मेहनतीमुळे भारत दक्षिण ध्रुवावर पोहोचला आहे, जिथे आजपर्यंत जगातील कोणताही देश पोहोचू शकलेला नाही. आजपासून चंद्राशी संबंधित समज बदलतील.

### विजयाच्या चंद्रपथावर चालण्याचा क्षण

» पंतप्रधान म्हणाले, 'माझ्या प्रिय कुटुंबीयांनो! असा इतिहास डोळ्यांसमोर घडताना पाहिल्यावर अभिमान वाटतो. अशा ऐतिहासिक घटना राष्ट्रजीवनाचे चैतन्य बनतात. हा क्षण अविस्मरणीय आहे. हा क्षण अभूतपूर्व आहे. विकसित भारताच्या शंखनादाचा हा क्षण आहे. नव्या भारताचा जयघोष करण्याचा हा क्षण आहे. अडचणींचा महासागर पार करण्याचा हा क्षण आहे. विजयाच्या चंद्रपथावर चालण्याचा हा क्षण आहे. हा क्षण 140 कोटी हृदयांच्या ठोक्यांच्या शक्तीचा क्षण आहे. हा भारताच्या नव्या ऊर्जेचा, नव्या चेतनेचा क्षण आहे. भारताच्या नव्या भाग्याचं आवाहन करण्याचा हा क्षण आहे. अमरत्वाच्या पहिल्या प्रकाशात यशाचे अमृत बरसले. आपण पृथ्वीवर एक प्रतिज्ञा घेतली आणि ती चंद्रावर साकार केली.

# 10वी-12वी परीक्षा वर्षातून दोनदा!

## विद्यार्थ्यांना दोन भाषांचा अभ्यास करता येणार

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्र सरकारने बुधवारी नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत शैक्षणिक सत्र 2024-25 साठी अधिसूचना जारी केली. त्यानुसार आता 10वी आणि 12वी बोर्डाच्या परीक्षा वर्षातून दोनदा घेतल्या जाणार आहेत. दोन्ही परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांना ज्यात जास्त गुण मिळतील, ते मोजले जातील.**



### जुलै 2020 मध्ये मिळाली मंजुरी

» नवीन शैक्षणिक धोरणाला 29 जुलै 2020 रोजी मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. यामध्ये शैक्षणिक धोरणात समानता, गुणवत्ता अशा अनेक मुद्द्यांवर लक्ष देण्यात आले आहे. केंद्र आणि राज्याच्या सहकार्याने सरकारने नवीन शैक्षणिक धोरणावर जीडीपीच्या 6% खर्च करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना दोन भाषांचा अभ्यास करावा लागणार आहे. यापैकी एक भारतीय भाषा असावी. मात्र, विद्यार्थ्यांना विषय निवडण्यास मोकळीक असेल. नवीन शैक्षणिक धोरणाला 29 जुलै 2020 रोजी मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. यामध्ये शैक्षणिक धोरणात समानता, गुणवत्ता अशा अनेक मुद्द्यांवर लक्ष देण्यात आले आहे. केंद्र आणि राज्याच्या सहकार्याने सरकारने नवीन शैक्षणिक धोरणावर जीडीपीच्या 6% खर्च करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यांनी निवडलेल्या स्ट्रीमच्या आधारावर त्यांच्यावर कोणतेही बंधन असणार नाही. शैक्षणिक सत्र 2024 साठीही पुस्तकांमध्ये बदल करण्यात येत असल्याचे शिक्षण मंत्रालयाने सांगितले. जड अभ्यासक्रम यापुढे पुस्तकांमध्ये ठेवण्यात येणार नाही. पुस्तकांच्या किमतीही कमी होतील. नवीन शैक्षणिक धोरण-2020 लक्षात घेऊन नवीन अभ्यासक्रम तयार केला जाईल. ज्यामध्ये शाळा मंडळ अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर ऑन-डिमांड परीक्षेची मागणी करू शकेल. या बदलांमागील उद्देश, बोर्डाच्या परीक्षांची महिनोनमहिने तयारी न करता विद्यार्थ्यांच्या आकलनाचे आणि कर्तृत्वाचे मूल्यांकन करणे हा आहे.

# चांद्रयान-3 च्या यशासाठी सीमाचे व्रत

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

प्रियकर सचिनसाठी पाकिस्तानातून भारतात आलेल्या सीमा हैदरने चांद्रयान-3 च्या यशासाठी व्रत ठेवले आहे. भारताचे चांद्रयान-3 चंद्रावर यशस्वीरित्या उतरल्यानंतरच आपले व्रत सोडणार असल्याचा संकल्प सीमाने केला आहे. सीमाच्या संकल्पाचा व्हिडिओ सोशल मीडियातून समोर आला आहे. सोशल मीडियात समोर आलेल्या व्हिडिओत सीमाने यान उतरल्यानंतरच व्रत सोडणार असल्याचे म्हटले आहे. "माझी तब्येत ठिक नाही, मात्र तरिही मी भारताच्या चांद्रयान-3 च्या यशासाठी व्रत ठेवले आहे आहे. या मोहिमेच्या यशामुळे भारताचे नाव जगात आणखी मोठे होणार आहे. म्हणूनच मोहीम पूर्ण यशस्वी होईपर्यंत मी व्रत ठेवणार आहे. त्यानंतरच मी माझे व्रत सोडेन. आपले चांद्रयान यशस्वीरित्या चंद्रावर उतरावे यासाठी मी सर्व देवांकडे प्रार्थना करत आहे. आपले पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी जी यासाठी खूप मेहनत घेत आहेत. यामुळे आपल्या देशाचे नाव आणखी मोठे होणार आहे. देशाचा दबदबा यामुळे जगात आणखी वाढणार आहे. यान यशस्वीरित्या चंद्रावर उतरल्यानंतरच मी माझे व्रत सोडणार आहे. राधे राधे, राधे कृष्णा, राधे शाम, राधे शाम." असे सीमा हैदर या व्हिडिओत बोलताना दिसत आहे. पाकिस्तानातून आपल्या 4 मुलांसह भारतात आलेल्या सीमा हैदरला आता येथे राहणे अत्यंत कठीण जात आहे. सीमा हैदरने व्हिसाशिवाय भारतात अवैधरित्या प्रवेश केला आहे.

# मोठं पाप झालं !



बॉलीवूडमध्ये जे ऑल टाईम बेस्ट कॉमेडी मुव्ही मध्ये हेरी फेरीचे नाव घ्यावे लागेल. प्रसिद्ध दिग्दर्शक प्रियदर्शन यांच्या या चित्रपटामध्ये अक्षय कुमार, सुनील शेट्टी आणि परेश रावल यांच्या प्रमुख भूमिका होत्या. सध्या या चित्रपटाच्या तिसऱ्या भागाविषयी चर्चा सुरु झाली आहे. पहिल्या हेरा फेरीला प्रेक्षकांचा जेवढा प्रतिसाद मिळाला तेवढा मात्र दुसऱ्या भागाला मिळाला नाही. त्यानं प्रेक्षकांची निराशा केली होती. त्यात आता पुन्हा तिसऱ्या पार्टमध्ये काय नवीन असणार आणि तो प्रेक्षकांच्या कौतुकास पात्र होणार का, असा सवाल चाहत्यांकडून उपस्थित केला जात आहे. हेरी फेरी, त्यानंतर फिर हेरा फेरी चाहत्यांसाठी नेहमीच आवडीचे चित्रपट राहिले आहेत. यासगळ्यात परेश रावल यांच्या एका प्रतिक्रियेमुळे चर्चेत आले आहे. रावल यांनी गेल्या वर्षी सगळ्यांना धक्का दिला होता. त्यात त्यांनी हेरा फेरी ३ मध्ये कार्तिक आर्यन काम करणार असल्याचे सांगितले होते. त्यानंतर चाहत्यांनी सोशल मिडियावर तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली होती. सगळ्यात पहिल्यांदा अक्षय कुमारनं आपण हेरा फेरी ३ चा भाग होणार नसल्याचे सांगितले होते. मात्र नंतर तो चित्रपटात काम करण्यास तयार झाला होता. परेश रावल यांनी पुन्हा एकदा कार्तिक आर्यनच्या सहभागावर दिलेली प्रतिक्रिया चर्चेचा विषय आहे. हेरी फेरी ३ मध्ये कार्तिकची भूमिका काय असणार असा प्रश्न चाहत्यांकडून विचारला जात आहे. परेश यांनी आपल्या प्रतिक्रियेमध्ये म्हटले आहे की, हे पाहा, कार्तिकची भूमिका हेरा फेरी ३ मध्ये पूर्णपणे वेगळी आहे. तुम्ही अक्षय कुमार आणि त्याच्या भूमिकेची तुलना करु नका. ते आपल्या सगळ्यांसाठी धोक्याचे असेल. काही दिवसांपूर्वी परेश रावल यांनी अशी प्रतिक्रिया दिली होती की, मी आता माझ्या बाबूराव आपटे नावाच्या पात्रावरुन जे मीम्स आहेत ते पाहून कंटाळलो आहे. गेली कित्येक वर्षांपासून हेरा फेरीचे मीम्स हे सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसत आहेत. त्यात आता काही बदल व्हावेत ही माझी इच्छा आहे. २००६ मध्ये हेरा फेरी नावाचा चित्रपट आला होता. त्याला प्रेक्षकांचा खूपच चांगला प्रतिसादही मिळाला.


मला एक गोष्ट प्रामाणिकपणे सांगावी लागेल ती म्हणजे फिर हेरा फेरीच्यावेळी आम्ही पूर्णपणे योगदान दिले नाही. त्याचा परिणाम जो झाला तो आपल्यासमोर आला. हा चित्रपट प्रेक्षकांना म्हणावा इतका काही आवडला नाही. आम्ही आणखी कथेकडे लक्ष द्यायला हवे होते. असेही रावल यांनी यावेळी सांगितले.

# अक्षय -रवीनाची जोडी एकत्र?

बॉलिवूडचा खिलाडी कुमार म्हणजेच अक्षय कुमार हा सध्या त्याच्या OMG2 या चित्रपटामुळे चर्चेत आहे. त्याचा हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करत आहेत. अक्षयच्या गेल्या काही चित्रपटांकडे पाहिलं तर त्याचे सलग सहा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप झाले होते मात्र OMG2 ने आता अक्षयच्या फ्लॉप सिनेमांवर फुल स्टॉप लावला आहे. सध्या अक्षय कुमार त्याच्या सिनेमातील अभिनेत्रीच्या नावामुळे चर्चेत असते. आता अक्षयच्या पुढच्या चित्रपटात त्याची एक्स गर्लफ्रेंड रवीना टंडन सोबत दिसणार असल्याचं बोलल जात आहे. बॉलिवूडमध्ये असा एक काळ होता ज्यावेळी अक्षय कुमार आणि रवीना टंडन यांची जोडी बॉक्स ऑफिसवर सुपरहिट होती. अनेक सिनेमांमध्ये त्यांनी एकत्र काम केले होते. ही जोडी बॉलिवूडमधील सर्वात हिट जोडींपैकी एक आहे. यासोबतच दोघांनीही एकमेकांना बराच काळ डेट केले होते. मात्र काही काळानंतर दोघेही वेगळे झाले. त्याचे प्रेम प्रकरण आणि ब्रेकअप आणि नंतर दुसऱ्याशी लग्न झाल्यानंतर दोघांची जोडी पुन्हा मोठ्या पडद्यावर पाहायला मिळाली नाही. त्याचे चाहते या जोडीला खुप मिस करत होते. त्यांना एकत्र पाहण्यासाठी चाहते अजूनही उत्सुक आहेत. आता तब्बल 19 वर्षांनंतर पुन्हा एकदा ही जोडी प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याच्या बातम्या समोर आल्या आहेत. मीडियाने दिलेल्या वृत्तानुसार, अक्षय कुमार आणि रवीना टंडन आता 'वेलकम 3'मध्ये एकत्र काम करणार आहेत. 'वेलकम टू द जंगल'मध्ये ही जोडी प्रेक्षकांचे मनोरंजन करणार आहेत.



# आमिषाचा खुलासा



सध्या मनोरंजन विश्वात दोन सिनेमे धुमाकूळ घातला आहे. त्यात एक आहे 'गदर2' आणि दुसरा आहे 'OMG2'. गदर2 च्या माध्यमातुन सनी देओल आणि आमिषा पटेल यांनी बऱ्याच वर्षानंतर मोठ्या पडद्यावर एंट्री केली आहे. दोघांची जोडी देखील प्रेक्षकांना खुप आवडत आहे. दरम्यान अमिषाने या चित्रपटाला मिळालेल्या यशानंतर अनेक मुलाखती दिल्या आहेत. याच एका मुलाखतीत तिने तिच्या फ्लॉप चित्रपटाबाबत सलमान खानला जबाबदार धरले आहे. तब्बल दोन दशकांनंतर आमिषाचा गदर 2 चित्रपट ब्लॉकबस्टर ठरला आहे. अमीषाने तिच्या करिअरच्या सुरुवातीला दोन सुपरहिट चित्रपट दिले, पण नंतर तिच्यावर फ्लॉप चित्रपटांचा शिक्का लागला. दरम्यान ती एका मुलाखतीत तिच्या 2002 मध्ये प्रदर्शित झालेल्या तिच्या 'ये है जलवा' या फ्लॉप चित्रपटाबद्दल बोलली. या चित्रपटात तिच्या सोबत बॉलिवूडचा सुपरस्टार सलमान खान हा मुख्य भूमिकेत होता. या चित्रपटाची स्टोरी जरी चांगली असली तरी हा सिनेमा काही खास कमाल करु शकला नाही. याबद्दल बोलतांना अमीषा पटेल म्हणाली की, डेव्हिड धवनच्या दिग्दर्शनात झालेल्या या चित्रपटात सर्व काही हिट झालं होतं मात्र त्यावेळी सलमान खानच्या 'हिट-अँड-रन' प्रकरणाच्या मीडिया कव्हरेजने या चित्रपटाच्या कामगिरीवर वाईट परिणाम झाला आणि चित्रपट खराब झाला. अमीषा म्हणते, "ये है जलवा हा डेव्हिड धवनच्या सर्वोत्कृष्ट चित्रपटांपैकी एक होता. सलमान खुपच देखणा दिसत होता. चित्रपटाचे संगीत आणि सर्व काही चांगले होते.

# त्या व्हिडिओनं नेटकरी हँग!



उर्फी जावेद ही नेहमीच तिच्या वेगवेगळ्या अतरंगी फॅशनमुळे चर्चेत असणारी सेलिब्रेटी आहे. त्यावरुन उर्फीला अनेकांनी साम, दाम, दंड आणि भेद याप्रकारे समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याचा तिच्यावर काहीही परिणाम झालेला नाही. आता उर्फीच्या हटके फॅशनचा एक व्हिडिओ समोर आला आहे. त्यात तिनं जी वेशभूषा केली आहे त्यावरुन तिच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. अनेकांनी उर्फीवर नेहमीप्रमाणे जोरदार टीका केली आहे. काहींनी तर उर्फीच्या हटके स्टाईलवर कौतुकाचा वर्षाव केला आहे. एवढी भारी आयडिया उर्फीला सुचते तरी कशी, असा प्रश्न तिला नेटकऱ्यांनी विचारला आहे. यापूर्वी उर्फीनं वेगवेगळ्या वस्तूंचा वापर करुन तिची फॅशनची हौस पूर्ण केली आहे. घरातील ग्लास, भांडी, मोबाईल फोन आणि चक्क कंगव्याचा ड्रेस उर्फीनं परिधान करुन आपण किती क्रिएटिव्ह आहोत याचा परिचय करुन दिला आहे. तिचा तो अंदाज सोशल मीडियावर नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेताना दिसत आहे. उर्फीनं तो व्हिडिओ शेयर केल्यानंतर त्यावर आलेल्या प्रतिक्रिया भन्नाट आहेत. एकानं लिहिलं आहे की, मी घरातील माझा कंगवा शोधत होतो. जेव्हा उर्फीचा व्हिडिओ पाहिला तेव्हा मात्र मला धक्काच बसला. उर्फी माझा कंगवा घेऊन गेली. आता काय बोलावं. दुसऱ्या युझर्सनं म्हटले की, उर्फी घरात तर पूर्ण कपड्यात असते. घराबाहेर पडल्यावर ती अशी का वागते हे कळत नाही. तिसऱ्या युझर्सनं लिहिलं आहे, बस किंवा ट्रेनमध्ये काहीजण कंगवा विकण्यासाठी येतात हे आम्हाला माहिती होतं. पण आता उर्फी देखील हा नवा बिझनेस करु लागली आहे की काय, असा प्रश्न तिचा तो व्हिडिओ पाहिल्यावर पडतो. एवढी कल्पनाशक्ती येते कुठून, असे प्रश्न तिला नेटकऱ्यांनी विचारले आहेत.

# तगड्या बजेटचा शाहरुखचा 'जवान'!

बॉलिवूडचा किंग म्हणजेच शाहरुख खान सध्या त्याच्या आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहे. त्याचा 'जवान' रिलीजसाठी सज्ज झाला आहे. या चित्रपटाचा ट्रेलर आणि गाणी रिलिज झाल्यापासून चाहत्यांमध्ये चित्रपटाबाबत उत्सुकता वाढली आहे. शाहरुख खानचा जवान हा चित्रपट ७ सप्टेंबरला प्रदर्शित होणार आहे.

चित्रपट प्रदर्शित होण्याच्या काही दिवस आधीच या चित्रपटावर सेन्सॉरने कात्री चालवली आहे आणि 7 कट केले आहेत. तसेच, चित्रपटाला U/A प्रमाणपत्र देण्यात आले आहे. शाहरुखच्या पठाण ने तर बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. अनेक रेकॉर्ड तयार केले आता तशीच काहीशी अपेक्षा



आता निर्मिती आणि शाहरुखच्या चाहत्यांना त्याच्या जवान या चित्रपटापासून आहेत. साऊथचे प्रसिद्ध दिग्दर्शक ॲटली यांच्या दिग्दर्शनाखाली हा सिनेमा तयार करण्यात आला आहे.

शाहरुखच्या 'जवान' चित्रपटाचे बजेट सुमारे 300 कोटी असून हा शाहरुखचा आतापर्यंतचा सर्वात महागडा चित्रपट असल्याचं देखील बोललं जातयं. आता जवान चित्रपटात काम करण्यासाठी कोणत्या कलाकारने किती मानधन घेतलं आहे यावर एक नजर टाकूया.. जवान सिनेमात शाहरुख खान हा डबल रोल करणार आहे. त्याने या चित्रपटात काम करण्यासाठी तब्बल 100 कोटी रुपयांची तगडी रक्कम वसूल केली आहे. त्याचबरोबर चित्रपटातील नफ्यातही त्याचा काही हिस्सा असल्याचं बोललं जात आहे.

# वनडे क्रिकेटमधील लाजिरवाणा विक्रम!

## » तरीही सूर्यकुमार यादवला आशिया चषकात प्रवेश

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आशिया चषक २०२३ साठी टीम इंडियाची घोषणा २१ ऑगस्टला केली. निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी दिल्लीत टीम इंडियाची घोषणा केली. रोहित शर्माच्या नेतृत्वात खेळणाऱ्या १७ सदस्यीय टीममध्ये केएल राहुल, जसप्रीत बुमराह आणि श्रेयस अय्यरचं पुनरागमन झालं आहे.**



या संघात आयसीसी टी-२० च्या क्रमवारीत पहिल्या स्थानावर असलेल्या सूर्यकुमारलाही जागा मिळाली आहे. अशातच सूर्यकुमार यादवचं विश्वचषक खेळणं जवळपास निश्चित झालं आहे. परंतु, सूर्यकुमार टी-२० मध्ये नंबर वन असला, तरीही त्याला वनडे क्रिकेटमध्ये धावांचा सूर गवसलेला नाहीय.

सूर्यकुमारची वनडे क्रिकेटमधील एकूण कामगिरीही चांगली नाहीय. त्याने आतापर्यंत २६ सामने खेळले आहेत. यामध्ये फक्त दोन अर्धशतकांचा समावेश आहे. यावर्षीचा सूर्यकुमारची कामगिरी पाहिली तर, १० वनडे सामन्यात त्याची सरासरी खूप खराब आहे. तसंच यावर्षी सूर्याच्या नावावर वनडे क्रिकेटमध्ये तीन वेळा डक आऊट होण्याचा लाजिरवाणा विक्रमही नोंदवला गेला आहे. अशी कामगिरी असतानाही सूर्यकुमारला संघात जागा मिळाली आहे.

वनडे क्रिकेटमध्ये यंदांचा हंगाम सूर्यकुमारसाठी खूप खराब गेला. यावर्षी सूर्यकुमारने एकूण १० वनडे क्रिकेटचे सामने खेळले आहेत. या सामन्यांमध्ये सूर्यकुमारे १४.११ च्या खराब सरासरीनुसार फक्त १२७ धावा केल्या आहेत. याचदरम्यान सूर्यकुमार यादव सलग तीन वन डे सामन्यांमध्ये गोल्डन डकचा शिकार झाला. त्यामुळे वनडे क्रिकेटमधील सर्वात लाजिरवाणा विक्रम सूर्यकुमारच्या नावावर नोंदवला गेला. सूर्यकुमार जगातील एकमेव खेळाडू आहे, जो तीन सामन्यांच्या मालिकेत सलग तीनवेळा गोल्डन डकवर बाद झाला आहे. सूर्यकुमारे भारतीय मैदानांवरच हा लाजिरवाणा विक्रम केला आहे. यावर्षी मार्च महिन्यात भारतीय संघाने ऑस्ट्रेलियाविरोधात तीन सामन्यांची मालिका खेळली. याच मालिकेत सूर्यकुमारने गोल्डन डकचा लाजिरवाणा विक्रम केला.

### शून्यावर बाद होणारे खेळाडू

- **सचिन तेंडुलकर** (1994)
- **अनिल कुंबळे** (1996)
- **जहीर खान** (2003-04)
- **इशांत शर्मा** (2010-11)
- **बुमराह** (2017-2019)
- **सूर्यकुमार यादव** (2023)

# इंडियाच्या 'गंभीर' परिस्थितीवर गौतमने दिली तिखट प्रतिक्रिया!

## » खेळाडूची गुणवत्ता आणि फॉर्म बघा!

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**भारतीय क्रिकेट संघाचा माजी सलामीवीर फलंदाज गौतम गंभीरने टीम इंडियाचे माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांच्या वनडे वर्ल्डकपच्या रणनितीचा चांगलाच समचार घेतला आहे. वनडे वर्ल्डकपसाठी तीन डावखुऱ्या फलंदाजांची आवश्यकता असल्याचं शास्त्री यांनी म्हटलं होतं. परंतु, गंभीरने शास्त्री यांच्या वर्ल्डकपच्या रणनितीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे.**



### रवी शास्त्री काय म्हणाले ?

» टीम इंडियाचा मध्यमक्रम मजबूत करण्यासाठी अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजासह आणखी दोन डावखुरे फलंदाज असू शकतात. पण ही जबाबदारी निवड समितीची आहे. कोणता खेळाडू फॉर्ममध्ये आहे, हे त्यांनी पाहावं. जर तिलक वर्मा चांगल्या फॉर्ममध्ये आहे, तर त्यांना टीममध्ये सामील करा. जर तुम्हाला वाटत असेल, यशस्वी जैस्वाल चांगली कामगिरी करत आहे, तर त्यालाही संघात समाविष्ट करू शकता. जर इशान किशन गेल्या सहा महिन्यांपासून खेळत असेल आणि विकेटकिपींगही करत असेल, तर त्याचा समावेश केला पाहिजे. पण दोन डावखुऱ्या फलंदाजांनाही संघात जागा मिळाली पाहिजे.

तीन डावखुऱ्या फलंदाजांमुळे संघाता काहीही फरक पडणार नाही. फलंदाज डाव्या हाताने खेळतो की उजव्या, हे महत्वाचं नाही. खेळाडूची कामगिरी आणि फॉर्म लक्षात घेऊनच निवड केली पाहिजे, स्क्वॉडमध्ये किती डावखुरे फलंदाज घेतले पाहिजेत, या गोष्टींना काही अर्थ नाही, असं गंभीरनं म्हटलं आहे.

टीम इंडियाचा मध्यमक्रम मजबूत करण्यासाठी अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजासह आणखी दोन डावखुरे फलंदाज असू शकतात. पण ही जबाबदारी निवड समितीची आहे.

कोणता खेळाडू फॉर्ममध्ये आहे, हे त्यांनी पाहावं. जर तिलक वर्मा चांगल्या फॉर्ममध्ये आहे, तर त्यांना टीममध्ये सामील करा. जर तुम्हाला वाटत असेल, यशस्वी जैस्वाल चांगली कामगिरी करत आहे, तर त्यालाही संघात समाविष्ट करू शकता. जर इशान किशन गेल्या सहा महिन्यांपासून खेळत असेल आणि विकेटकिपींगही करत असेल, तर त्याचा समावेश केला पाहिजे. पण दोन डावखुऱ्या फलंदाजांनाही संघात जागा मिळाली पाहिजे.

गंभीरने म्हटलं की, एक चांगला खेळाडू, जो उजव्या हाताचा असो किंवा डावखुरा असो, तो प्रत्येक परिस्थितीत चांगला खेळेल. जर अय्यर चांगला खेळतो किंवा राहूल धावा करतो, तर त्यांना निवडा. जर ते फॉर्ममध्ये नसतील तर त्यांच्या जागी डावखुऱ्या फलंदाजाची निवड करणं गरजेचं नाही.

डावखुऱ्या फलंदाजांबाबत अशाप्रकारची चर्चा करण्याची आवश्यकता नव्हती, असं मला वाटतं. तुम्ही नेहमीच खेळाडूची गुणवत्ता आणि फॉर्म बघा, पण किती खेळाडू डावखुरे आहेत, हे पाहण्यात वेळ वाया घालवू नका, असं म्हणत गंभीरने शास्त्री यांच्यावर अप्रत्यक्षपणे टीका केली आहे.भारतीय क्रिकेट संघाचा माजी सलामीवीर फलंदाज गौतम गंभीरने टीम इंडियाचे माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांच्या वनडे वर्ल्डकपच्या रणनितीचा चांगलाच समचार घेतला आहे. वनडे वर्ल्डकपसाठी तीन डावखुऱ्या फलंदाजांची आवश्यकता असल्याचं शास्त्री यांनी म्हटलं होतं. परंतु, गंभीरने शास्त्री यांच्या वर्ल्डकपच्या रणनितीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे.

# पुजाराचं क्रिकेट करिअर संपलं?

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

भारताच्या कसोटी संघातून बाहेर पडणं, हा एक एक निराशाजनक अनुभव होता, अलं अनुभवी फलंदाज चेतेश्वर पुजाराने म्हटलं आहे. ३५ वर्षीय या फलंदाजाला वेस्ट इंडिज दौऱ्यासाठी भारतीय कसोटी संघात स्थान मिळालं नव्हतं. भारतासाठी १०३ कसोटी खेळणाऱ्या पुजाराने राष्ट्रीय संघासाठी द ओवल मैदानात ऑस्ट्रेलियाविरोधात झालेल्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलमध्ये शेवटचा कसोटी सामना खेळला. या सामन्यात त्याने १४ आणि २७ धावा केल्या होत्या. पुजाराने फायनल वर्ड पॉडकास्टशी बोलताना म्हटलं, "मागील काही वर्षात चढ-उतार पाहायला मिळाले. एक खेळाडूच्या रुपात ही एकप्रकारची परीक्षा असते. कारण ९० हून अधिक कसोटी सामने खेळल्यानंतरही मला स्वत:ला आताही सिद्ध करावं लागतं. मला आताही सिद्ध करावं लागतं की, या जागेवर राहण्याचा मला हक्का आहे. हे एक वेगळ्या प्रकारचं आव्हान आहे. टीममधून बाहेर झाल्यानंतर कधी कधी मला अस्थिर झाल्यासारखं वाटतं. ९० हून अधिक कसोटी सामने खेळून आणि पाच-सहा हजार धावा केल्यानंतर स्वत:ला सिद्ध करावं लागत आहे. हे सोपं नाहीय. खरंच तुम्ही सक्षम आहात का? कधी कधी अशाप्रकारची शंकाही मनात येते. इंग्लिश काउंटी क्रिकेटमध्ये ससेक्सकडून खेळणाऱ्या पुजाराने म्हटलं, जर तुम्हाला सतत स्वत:ला सिद्ध करावं लागत असेल, तर तुम्ही विचार कराल की, असं करणं गरजेचं आहे का. पुजाराने घरेलू क्रिकेटच्या सामन्यांत तीन शतक ठोकले आहेत. सौराष्ट्रच्या या फलंदाजाने दुलीप ट्रॉफीत पश्चिम क्षेत्राकडून खेळताना मध्य क्षेत्राविरोधात १३३ धावा केल्या. त्यांनी वनडे कपमध्ये ससेक्सकडून नॉर्थम्पटनशर आणि समरसेटविरोधात अनुक्रमे नाबाद १०६ आणि ११७ धावा केल्या. पुजाराने पुढं बोलताना म्हटलं, मला माहित आहे की, मी भारतीय क्रिकेटला ज्या प्रकारे योगदान दिलं आहे, ते पाहता मला अजूनही खूप योगदान द्यायचं आहे. काही वेळेपूर्वी मला सांगण्यात आलं होतं की, जेव्हा मी भारतीय टीमसाठी ७० किंवा ८० हून अधिक धावा केल्या. त्यावेळी जवळपास ८० टक्के वेळा भारताचा विजय झाला. संघात निवड होण्याबाबत मी विचार करत नाही. माझं लक्ष चांगली कामगिरी करण्यावर असणार आहे.